# आयुष्यमान भारत योजना

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना (MJPJAY) व आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (AB-PMJAY) अंतर्गत पात्र लाभार्थ्यांनी आयुष्मान कार्ड काढणे व e-KYC प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे.

आयुष्मान कार्डशिवाय योजनेअंतर्गत उपचाराचा लाभ घेता येत नाही. त्यामुळे पात्र नागरिकांनी आपले e-KYC पूर्ण करून आयुष्मान कार्ड प्राप्त करून घ्यावे.

💳 कॅशलेस उपचार म्हणजे काय?

योजनेत समाविष्ट आजारासाठी अंगीकृत रुग्णालयात उपचार घेताना, मंजूर पॅकेजअंतर्गत पात्र उपचाराचा खर्च लाभार्थ्याला स्वतःच्या खिशातून भरावा लागत नाही. हा खर्च योजनेच्या नियमानुसार रुग्णालयाला दिला जातो.

योजनेचे लाभ :

- समाविष्ट आजारांवरील पात्र उपचार
- पात्र शस्त्रक्रिया व वैद्यकीय उपचार
- अंगीकृत शासकीय व खाजगी रुग्णालयांमध्ये कॅशलेस उपचाराची सुविधा
- उपचाराचा आर्थिक भार कमी करण्यास मदत

📞 हेल्पलाइन : 14555

आजच आपले e-KYC पूर्ण करून आयुष्मान कार्ड काढून घ्या आणि योजनेचा लाभ घ्या.

आवश्यक कागदपत्रे

आधार कार्ड

आधारशी लिंक असलेला मोबाईल क्रमांक (OTP साठी, उपलब्ध असल्यास)

रेशन कार्ड / कुटुंब ओळखपत्र (लाभार्थी पात्रतेनुसार)

कुटुंबातील सदस्यांची आवश्यक ओळखपत्रे

आयुष्यमान कार्ड कुठे काढून मिळेल- आपल्या जवळील आरोग्य केंद्रास भेट द्यावी.